संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

राजकीय महत्त्वाकांक्षेची टेंडर प्रक्रिया

राज्यात महापालिका निवडणुकांचाही बिगुल वाजला आहे. निवडणुका कोणत्याही असो. त्याला राजकीय महत्त्वाकांक्षेचाच ठिकठिकाणी दर्प येतो. कोणालाही सामान्य माणसाच्या भल्यासाठी जनतेला दिलासा देण्यासाठी किंवा सामान्य माणसाच्या हितासाठी निवडणुका लढवायच्या नसतात. आयुष्यात एकदा तरी एखादी तरी निवडणूक जिंकावी अशी महाराष्ट्रातल्या करोडो लोकांची इच्छा असते. त्यातल्या काही लाख लोकांची राजकीय महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी हे लोक राजकीय पक्षांच्या दावणीला स्वतःला बांधून घेतात. त्या लाखांमधल्या काही हजारो लोकांना निवडून आणण्याचे कंत्राट वेगवेगळे राजकीय पक्ष घेत असतात म्हणजे ज्याप्रमाणे सगळ्या महापालिकांमध्ये कंत्राटांच्या अर्थकारणावरच राजकारण्यांचा सत्तेचा दरबार चालत असतो. त्याच महापालिका निवडणुकांमध्ये निवडून येण्याचे कंत्राट हे राजकीय पक्ष स्वतःकडे घेतात. नगरसेवक पदाच्या टेंडरसाठी अर्ज भरणे म्हणजे उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा प्रकार असतो. आपण कितीही असे म्हटले की, मतदार उमेदवारांना निवडून देतात पण हे अर्धसत्य ठरते. मतदारांनादेखील आमिष दाखवले जातात आणि राजकीय पक्ष अक्षरशः वाटेल ते प्रकार करून आपला उमेदवार निवडून आणत असतात. भारतात संसदीय लोकशाही व्यवस्था आहे आणि ती लोकशाही टिकवून ठेवण्याची जबाबदारी आपल्यावरच अवलंबून आहे अशा थाटात राजकीय पक्षांचे व्यवहार सुरू असतात. परंतु आज या संसदीय लोकशाही व्यवस्थेत निवडणुकांना कोणताही पर्याय नाही. म्हणूनच निवडणुकांचे बिगुल वाजल्यावर राजकारणीदेखील स्वतःचेच ढोल बडवण्यासाठी सज्ज होतात. ज्याच्याकडे जसा पैसा आहे. माणसं गोळा करण्याची ताकद आहे किंवा साम,दाम, दंड, भेद याच्या चौफेर प्रहार करण्याची ताकद आहे. ते निवडून येण्याची जास्त शक्यता असते. विशेषतः गेल्या काही वर्षापासून महापालिका निवडणुका म्हणजे मिनी विधानसभा निवडणुका झालेल्या आहेत आणि याच पद्धतीने पैशाचा आणि प्रचाराचा धुरळा उडत असतो. यातून नेमके कोणत्या लोकशाहीचे समर्थन होते. हे प्रत्यक्ष ब्रह्मदेवही सांगू शकणार नाही.

मुंबई महापालिकेची ऐतिहासिक निवडणूक

लोकशाही व्यवस्था स्वीकारल्याने ज्या काही गोष्टी अनिवार्य आहेत त्या केल्याशिवाय लोकांपुढेही पर्याय नसतो. परंतु ही व्यवस्था अधिक पारदर्शक व्हावी, लोकशाही व्यवस्थेवरचा विश्वास अधिक मजबूत व्हावा यासाठी खूप सुधारणा घडवून आणण्याची आवश्यकता आहे परंतु ते करण्याची किंवा तसा आग्रह धरण्याची कोणत्याही राजकीय पक्षाची किंवा नेत्याची प्रामाणिक इच्छा नसते. जर या व्यवस्थेमध्ये पारदर्शकपणा असता तर राज्यातल्या महापालिका निवडणुका इतक्या लांबल्या नसत्या. यावेळची मुंबई महापालिकेची निवडणूक ही एकाअर्थी ऐतिहासिकच म्हणावी लागेल. यापूर्वी कधीही राज्याची राजधानी आणि देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई महानगराचा कारभार तब्बल साडेआठ वर्षे प्रशासकांच्या ताब्यात राहिला नव्हता.म्हणजे लोकशाही व्यवस्थेचा बुरखा पांघरून देशातील सर्वात श्रीमंत महापालिकेची चावी ही लोकप्रतिनिधींच्याऐवजी प्रशासकाच्या ताब्यात होती. आत एकट्या मुंबई महानगरपालिकेचे बजेट हे ७६ हजार कोटींचे आहे. इतके मोठे अंदाजपत्रक देशातल्या कोणत्याही महापालिकेचे नाही. आंतरराष्ट्रीय महानगरी म्हणून मुंबईला असलेला नावलौकिक हा आणखीनच वेगळ्या स्वरुपाचा ठरतो. अनेक अर्थाने लौकिकप्राप्त मुंबई महानगरीत साडेआठ वर्षानंतर निवडणूक होण्याचा अलौकिक प्रकार घडून येत आहे. इथेसुद्धा मुंबईच्या विकासाचे आणि त्यातही सामान्य मुंबईकरांना दिलासा देण्याची राजकीय पक्षांकडे किती प्रामाणिक इच्छा आहे. हे कोणीही सांगू शकत नाही. या महानगरीतून होणारा प्रचंड कर आणि या महानगराची प्रचंड लोकसंख्या लक्षात घेऊन वेगवेगळ्या व्यवस्था करण्याशिवाय गत्यंतर नसते. त्या व्यवस्था करताना सगळ्या राजकीय पक्षांचा डोळा हा महापालिकेच्या तिजोरीवर असतो. म्हणजे जो काही निवडकीचा बिगुल वाजतो तो सत्ता गाजवण्यासाठी आणि पैसा कमावण्यासाठी मिळालेला हिरवा कंदिल असतो. राजकारणाच्या साठमारीमध्ये इतक्या मोठ्या लोकशाही व्यवस्थेची प्रचंड घुसमट होते हे कोणीही नाकारू शकणार नाही. सध्याच्या मतदानाचे स्वरु पही असेच झालेले आहे. दानपेटीत टाकलेला पैसा हा चांगल्या कामासाठी वापरला जावा अशी दान देणाऱ्याची इच्छा असते. पण तसा तो वापरला जाईलच याची खात्री नसते. तशीच परिस्थिती आज मतदानाची झालेली आहे.

फसवे आणि छचोर शब्दप्रयोग

निवडणुकांसाठी वापरले जाणारे शब्दप्रयोग तितकेच फसवे आणि छचोर स्वरुपाचे असतात. रणसंग्राम, रणधुमाळी, म्हणजे यातून सौहार्दता व्यक्त होण्याऐवजी संघर्षालाच आमंत्रण दिले जाते. कारण निवडणुकीच्या मैदानात हे राजकीय युद्ध खेळले जाते आणि म्हणून निवडणूक लढवणे किंवा ती जिंकणे, हरणे असेच शब्दप्रयोग रूढ झालेले आहेत. जर निवडणूक ही लोकशाही व्यवस्थेच्या संवर्धनासाठी असेल तर त्यासाठी निवडणूक लढणे किंवा लढवणे यासारखे शब्दप्रयोग अनावश्यक ठरतात. सामोपचाराने समजूतदारपणाने त्याला केवळ निवडणूक प्रक्रिया म्हणता येऊ शकते. परंतु ही प्रवृत्तीच शिल्लक राहिलेली नाही. असे सगळे फसवे आणि छचोर शब्द वापरून मतदारांना गृहित धरण्याचा प्रकार होतो. त्यातला मनोरंजनाचा भाग तर आणखी असा आहे की, अनेक ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होतात. हा शब्ददेखील राजकारण्यांनी आपल्या सोयीसाठी शोधून काढलेला आहे. कोणतीही लढत ही मैत्रीपूर्ण असू शकत नाही आणि कोणतेही मित्र अशा पद्धतीने एकमेकांविरुद्ध लढतही नाहीत फक्त खेळांमध्येच तो खिलाडूपणा दाखवता येऊ शकतो. तसे असेल तर मग निवडणुकांनासुद्धा राजकीय खेळ म्हणायला हवे. परंतु तसे म्हटले तरी त्याचाही ते केव्हा खुळखुळा करतील याचा नेम नाही. नियमानुसार पार पडणारी ही निवडणूक प्रक्रियाच ठरली पाहिजे. सत्ता हडपण्याकरीता लोकशाही व्यवस्थेचा मनमानी वापर आणि मतदारांना गृहित धरण्याचा धक्कादायक प्रकार होत राहतो.

सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

विरोधक हा असा गुरु आहे,
जो तुमच्या कमतरता परिणामांसह दाखवून देतो.

पंचांग

बुधवार, १७ डिसेंबर २०२५
शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर

*** मार्गशीर्ष कृष्ण त्रयोदशी**
*** नक्षत्र : विशाखा**
-: जन्मराशी :-
००-०१ ते १०-२५ तूळ
१०-२६ ते २४-०० वृश्चिक

रवी उदय- ०७-०६
रवी अस्त- १८-०३

प्रदोष, संत गुळवणी महाराज जयंती-सांगली, श्री संताजी महाराज पुण्यतिथी

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता १) दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८. २) एलिगंट ऑफसेट प्रिंटर्स प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं.एफ ७-१ आणि एफ ७-२/२, एमआयडीसी, शिरोली इंडस्ट्रीयल एरीया, शिरोली गाव, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर - ४१६१२२ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at 1) Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. . 2) Elegant Offset Pvt. Ltd., Address : Plot No.F7-1 & F7-2/2, M.I.D.C., Shiroli Industrial Area, Village Shiroli, Tal. Hatkanagle, Dist Kolhapur-416122. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

भारत-दक्षिण आफ्रिका आज चौथा सामना
मालिका विजयासाठी भारत प्रयत्न करणार

■ लखनौ

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील टी-२० मालिकेतील चौथा सामना उद्या लखनौ येथील भारतरत्न श्री अटलबिहारी वाजपेयी एकाना क्रिकेट स्टेडियमवर खेळला जाणार आहे. धर्मशाला येथे झालेल्या तिसऱ्या टी-२० सामन्यात दणदणीत विजय मिळवून भारताने मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे. चौथा सामना रंगतदार होणार असून भारत मालिका विजयासाठी प्रयत्न करणार आहे.

दोन्ही संघ आता चौथ्या टी-२० सामन्यासाठी उत्तर प्रदेशची राजधानी लखनौ येथे दाखल झाले आहेत. भारतीय संघ आपली लय कायम ठेवून मालिका जिंकण्याचा प्रयत्न करेल. तिसऱ्या सामन्यात अष्टपैलू खेळाडू अक्षर पटेलला उर्वरीत दोन सामन्यांमधून वगळण्यात आले आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्याला सामन्यांमधून काढण्यात आल्याची माहिती बीसीसीआयने दिली आहे. अक्षर पटेलच्या जागी आता अष्टपैलू खेळाडू शाहबाज अहमदचा समावेश करण्यात आला आहे. तिसऱ्या सामन्यात अक्षर व बुमराहच्या जागी कुलदीप आणि हषित राणा खेळले.

भारतीय संघ

सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुभमन गिल (उपकर्णधार), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पंड्या, शिवम दुबे, जितेश शर्मा (विकेटकीपर), संजू सॅमसन (विकेटकीपर), जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव, हर्षित राणा, वॉशिंग्टन सुंदर, शाहबाज अहमद.

अनकॅप्ड खेळाडूंना विक्रमी किंमत

» पान १ वरून

लिलावात कार्तिक शर्मासाठी सीएसके, कोलकाता नाईट रायडर्स आणि हैदराबाद यांच्यात जोरदार चुरस रंगली. शेवटी सीएसकेने १४.२० कोटी रुपयांवर कार्तिकला खरेदी केले. प्रशांत वीरसाठीही राजस्थान, लखनौ आणि सीएसके यांच्यात चुरस सुरू होती. त्याची मूळ किंमत फक्त ३० लाख रुपये होती. तो १४.२० कोटी रुपयांत विकला गेला. मुंबई इंडियन्सने क्विंटन डी कॉकला १ कोटी रुपयांत आणि लखनौने ॲरिच नॉर्खियाला २ कोटी रुपयांत संघात घेतले. सनरायझर्स हैदराबादने शिवांग कुमारला ३० लाख रुपयांत खरेदी केले. या लिलावात अनेक मोठ्या खेळाडूंची विक्रीच झाली नाही. यामध्ये लियाम लिव्हिंगस्टोन, रचिन रवींद्र, महेश थीकशाना, मुजीब उर रहमान, राहुल चहर, दीपक हुड्डा, केएस भरत, जेराल्ड कोएत्झी, स्पेन्सर जॉन्सन आणि फझलक फारुकी यांचा समावेश आहे.

ज्योती ग्लोबल प्लास्ट लिमिटेड
नोंद. कार्यालय पत्ताः आर-५५४/५५५ टीटीसी एम आय डी सी क्षेत्र, रबाळे, नवी मुंबई - ४००७०१.
सीआयएनः U28129MH2004PLC143876, ई-मेलः info@jyotiglobalplast.com
मोबा. क्र.: ८५९१५८५४९७ । वेबसाईटः https://jyotiglobalplast.com/

टपाली मतदान सूचना आणि ई-मतदानाची माहिती

याद्वारे सूचना देण्यात येते की, ज्योती ग्लोबल प्लास्ट लिमिटेड ('कंपनी') खालील ठरावांवर दूरस्थ ई-मतदानाद्वारे टपाली मतदानाच्या मार्गे कपनीच्या ईक्विटी भागधारकांची ('सदस्य') मंजुरी प्राप्त करु इच्छितेः

ठरावाचा प्रकार	ठरावाचे वर्णन
विशेष ठराव	कंपनीच्या मेमोरेंण्डम ऑफ असोसिएशनच्या उद्देश खंडाच्या बदलास मंजुरी देणे.

टपाली मतदान सूचना ('सूचना') कंपनीची वेबसाइट https://jyotiglobalplast.com/, एमयूएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (दूरस्थ ई-मतदान सुविधा प्रदान करण्याकरिता एजन्सी)ची वेबसाईट www.in.mpms.mufg.com आणि स्टॉक एक्सचेंजची म्हणजेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडची ('एनएसई') वेबसाइट www.nseindia.com/ वर उपलब्ध असेल.
कंपनी कायदा, २०१३ च्या तरतुदी आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने पारित केलेले सर्वसाधारण परिपत्रक क्रमांक १४/२०२० दिनांक ८ एप्रिल २०२०, १७/२०२० दिनांक १३ एप्रिल २०२० आणि या संदर्भात जारी केलेल्या त्यानंतरच्या परिपत्रकांनुसार, नवीनतम परिपत्रक ३/२०२५ दिनांक २२ सप्टेंबर २०२५ (एकत्रितरित्या 'एमसीए परिपत्रके' म्हणून उल्लेखित), कंपनीने दि. १६ डिसेंबर २०२५ रोजी टपाली मतदानाची सूचना, ज्यांचे ईमेल पत्ते निबंधक आणि हस्तांतरण एजंट ("आरटीए") / डिपॉझिटरीज / कंपनीकडे नोंदणीकृत आहेत आणि ज्यांची नावे दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी ('कट-ऑफ तारीख") डिपॉझिटरीज/ कंपनीचे आरटीए असलेल्या एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीचे नाव लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) यांच्याकडून कंपनीला प्राप्त झालेल्या सदस्यांच्या नोंदवही/लाभार्थी मालकांच्या यादीत नोंदवलेली आहेत अशा सदस्यांना केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे पाठवली आहे. त्यानुसार, या टपाली मतदानासाठी सदस्यांना सूचनेची भौतिक प्रत, टपाली मतदान अर्ज आणि प्रीपेड बिझनेस रिप्लाय लिफाफा पाठवण्यात आलेला नाही. कंपनीने सदर सूचना पाठवण्याचे काम दि. १६ डिसेंबर २०२५ रोजी पूर्ण केले आहे.
कंपनीने त्यांच्या सदस्यांना दूरस्थ ई-मतदान सुविधा प्रदान करण्याकरिता एमयूएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडची सेवा नियुक्त केली आहे. दूरस्थ ई-मतदान कालावधी बुधवार, दि. १७ डिसेंबर, २०२५ रोजी स. ९.०० (भाप्रवे) पासून सुरु होईल आणि गुरुवार, दि. १५ जानेवारी, २०२६ रोजी सायं. ५.०० (भाप्रवे) वा. समाप्त होईल. त्यानंतर एमयूएफजीद्वारे ई-मतदान यंत्रणा अकार्यक्षम केली जाईल. सदस्यांचे मतदानाचे हक्क, कट-ऑफ दिनांकानुसार कंपनीच्या भरणा केलेल्या इक्विटी भाग भांडवलामध्ये त्यांच्याकडे असलेल्या इक्विटी भागांच्या प्रमाणात असेल. एकदा ठरावावर मतदान केल्यावर, सदस्य नंतर त्यामध्ये बदल करु शकणार नाही. कृपया नोंद घ्यावी की, सदस्यांच्या संमती किंवा असहमतीची माहिती केवळ दुरस्थ ई-मतदान प्रणालीद्वारेच दिली जाईल. ज्यांची नावे कट-ऑफ तारखेनुसार डिपॉझिटरीजद्वारे राखल्या जाणाऱ्या सदस्य नोंदवही/लाभार्थी मालकांच्या यादीमध्ये नोंदवलेली आहेत, केवळ त्याच सदस्यांना दुरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान करण्याचा अधिकार असेल.
सदस्यांना ही सूचना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने प्राप्त व्हावी यासाठी, कंपनीने एमसीएच्या परिपत्रकांनुसार आपल्या आरटीएसोबत ईमेल पत्ते नोंदणी करण्याची व्यवस्था केली आहे. ज्या सदस्यांनी आपले ईमेल पत्ते त्यांच्या डिपॉझिटरीजकडे नोंदवलेले नाहीत, ते ते आरटीएकडे नोंदवू शकतात. आरटीएकडे ईमेल पत्ता नोंदवण्याची प्रक्रिया आणि दुरस्थ ई-मतदानाची प्रक्रिया सूचनेमध्ये दिली आहे.
ई-मतदान सुविधा केवळ खालील कालावधीदरम्यान उपलब्ध असेलः

सुरु होण्याचा दिवस, दिनांक आणि वेळ	बुधवार, दि. १७ डिसेंबर, २०२५ रोजी स. ९.०० (भाप्रवे) पासून
ई-मतदान समाप्तीचा दिवस, दिनांक आणि वेळ	गुरुवार, दि. १५ जानेवारी, २०२६ रोजी सायं. ५.०० (भाप्रवे) वा.पर्यंत

मे. सीएस आशिता कौल ॲण्ड असोसिएट्स, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी, (सदस्यता क्र. ६९८८ आणि प्रॅक्टीसचे प्रमाणपत्र क्र. ६५२९) यांची टपाली मतदान दूरस्थ ई-मतदानाद्वारे निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने आयोजित करण्याकरिता स्क्रुटिनायझर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मतदानाचे निकाल दि. १७ जानेवारी, २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी घोषित करण्यात येतील आणि कंपनीचे वेबसाईट https://jyotiglobalplast.com/ वर प्रदर्शित करण्यात येतील आणि स्टॉक एक्सचेंज म्हणजेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड www.nseindia.com/ ला सूचित करण्यात येईल.
मतदानाची छाननी केल्यानंतर, स्क्रूटिनायझर टपाली मतदानाच्या निकालाबाबतचा अहवाल कंपनीच्या अध्यक्षांना किंवा संचालक मंडळाने अधिकृत केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीला शनिवार, दि. १७ जानेवारी, २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करेल. दिलेल्या मतांच्या वैधतेबाबत स्क्रूटिनायझरचा निर्णय अंतिम असेल. पोस्टल बॅलेटद्वारे झालेल्या मतदानाचे निकाल, स्क्रूटिनायझरच्या अहवालासह, कंपनीच्या वेबसाइटवर आणि एमयूएफजीच्या वेबसाइटवर उपलब्ध करून दिले जातील आणि ज्या ठिकाणी कंपनीच्या प्रतिभुती सूचीबद्ध आहेत, त्या एमएसईला कळवले जातील. याव्यतिरिक्त, निकाल कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातील सूचना फलकावर देखील लावला जाईल.
जर भागधारकांना/सदस्यांना ई-मतदानाबाबत काही शंका असतील, तर ते https://instavote.linkintime.co.in येथे 'हेल्प' विभागात उपलब्ध असलेले वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यूज) आणि इन्स्टाव्होट ई-मतदान पुस्तिका पाहू शकतात किंवा enotices@linkintime.co.in यावर ईमेल पाठवू शकतात किंवा ०२२ - ४९१८६००० या क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

ज्योती ग्लोबल प्लास्ट लिमिटेड करिता
सही/-
मयूर के दुबे
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
सदस्यता क्र. ए७८९८०

मध्य रेल्वे

ई-निविदा सूचना क्र. एनआयटी/०१/२५/५२ दिनांक १५-डिसें.-२०२५

भारताचे राष्ट्रपतींकरिता आणि त्यांच्या वतीने, प्रमुख मुख्य सामग्री व्यवस्थापक, मध्य रेल्वे खालील वस्तुंच्या पुरवठ्याकरिता ई-निविदा आमंत्रित करीत आहेत.

अ. क्र.	निविदा क्र.	तपशील	परिमाण	नियत दिनांक
१	७१२५५०१२सी	सीएएमसी सह १५ टन क्षमतेची इलेक्ट्रिक ओव्हरहेड ट्रॅव्हलिंग (ईओटी) क्रेन	०१ नग	२९-डिसें.-२५
२	४२२५३१३८ए	न्युमॅटिक नियंत्रण युनिट	३१ नग	२२-डिसें.-२५
३	१०२५१५८०	लॉंग लाईफ लोको साईड बफर असेंब्ली	५५४ नग	२२-डिसें.-२५
४	३८२५२१४९	लोअर स्प्रिंग बीम व्यवस्था	३७६ नग	२३-डिसें.-२५
५	२७२५३४६५	तापमान सेंसर असेंब्ली	५५६ नग	२२-डिसें.-२५
६	२७२५२१५३	कंडेंसर बुशिंग	१८ नग	२२-डिसें.-२५
७	२७२५१९३३	एक्सल बॉक्स हाऊसिंग	१२४ नग	२४-डिसें.-२५
८	२७२५२४४४	कायमस्वरुपी फिल्ड डायव्हर्टर	१३ संच	२६-डिसें.-२५
९	२७२५४७४६	हाय व्होल्टेज बुशिंग	३२ नग	१८-डिसें.-२५
१०	४२२५०००१ए	बेयरिंग शिल्ड	१२९ नग	०५-जाने-२६
११	४३२५००१५	डिझेल इंजिन लीड ॲसिड स्टार्टर बॅटरीज	१३१ संच	०१-जाने-२६
१२	आरजीसी ५०२५९००२	रेल्वे सिग्नलिंग आणि दूरसंचार स्थापनांकरिता भूमिगत जेली भरलेल्या ६ क्वाड × ०.९ मिमी व्यासाच्या कॉपर कंडक्टर केबल पुरविण्यासाठी रनिंग कंत्राट (आरडीएसओ निर्देश क्र. आयआरएसः टीसी-३०/२००५ (आवृत्ती-१) सुधारणा क्र. १ ते ५ सह)	१२,००० किमी	२२-डिसें.-२५
१३	५१२५६०६८	आरडीएसओ आरेखन क्र. टी-८५३३ ते टी-८५३६ नुसार ६० किग्रॅ आणि ५२ किग्रॅ रेल्स करिता १ मीटर लांब संयोजन फिश प्लेटचे उत्पादन आणि पुरवठा	२६६० संच	२९-डिसें.-२५

टीपः वरील सर्व उल्लेखित निविदा या ई-निविदा आहेत आणि सर्व निविदाकारांना विनंती आहे की, त्यांनी त्यांच्या बोली आयआरईपीएस वेबसाईट **https://www.ireps.gov.in** द्वारे सादर कराव्या. वरील उल्लेखित निविदा आणि इतर पुरवठा निविदांसंबंधी अधिक तपशिलांकरिता कृपया आयआरईपीएस वेबसाईटला भेट द्यावी.
DE-749
प्रमुख मुख्य सामग्री व्यवस्थापक
अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

ई-लिलाव सूचना
नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अंतर्गत
बिलबेरी हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)
नोंद कार्यालयः १३०, शांता इंडस्ट्रीयल इस्टेट, १ ला मजला, आय. बी. पटेल मार्ग, गोरेगाव पूर्व, मुंबई ४०००६३.
कॉर्पोरेट ऋणकोच्या संपत्तीची विक्री
नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या तरतुदींअंतर्गत

लिलावाचा दिनांक आणि वेळः शनिवार, दि. ३ जानेवारी, २०२६, दु. १२.०० ते दु. २.०० बाजेपर्यंत (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)

नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ आणि त्याअंतर्गत असलेल्या नियमनांअंतर्गत, सर्वसाधारण जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठाद्वारे त्यांच्या आदेश दिनांक ३०.०६.२०२५ (दि. ०७.०७.२०२५ रोजी प्राप्त) नुसार नियुक्त परिसमापकाद्वारे बनविण्यात आलेल्या परिसमापन संपत्तीचा भाग असलेल्या **"मे. बिलबेरी हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड - परिसमापनामध्ये (कॉर्पोरेट ऋणको)"**च्या संपत्तीच्या विक्रीकरिता ई-लिलाव प्रक्रियेच्या संबंधात इच्छुक बोलीदारांकडून बोली आमंत्रित करण्यात येत आहेत. निम्नस्वाक्षरीकारांद्वारे ई-लिलाव प्लॅटफॉर्म https://baanknet.com मार्फत विक्री करण्यात येईल.
आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ अन्वये कॉर्पोरेट ऋणकोच्या संपत्तीची विक्री

संपत्तीचे तपशील	राखीव किंमत	इसारा रक्कम अनामत	बोली विस्तार मूल्य
जमीन आणि इमारत (गेस्ट हाऊस) I. भूखंड क्र. आरआय-३९, युनिट क्र. ४, १ला मजला, स्प्लेन्डर अपार्टमेन्ट्स, एमआयडीसी, रेसिडेन्शियल झोन, जि. ठाणे, उप जिल्हा - कल्याण, डोंबिवली पूर्व - ४२१२०३. क्षेत्रफळ मोजमाप ७१.७३ चौ.मी.	रु. ४९,७०,७२०/- (रुपये एकोणपन्नास लाख सत्तर हजार सातशे वीस मात्र)	रु. ४,९७,०७२/- (रुपये चार लाख सत्याण्णव हजार बाहत्तर मात्र)	रु. १,००,००० (रुपये एक लाख मात्र)
प्लान्ट आणि मशिनरी - मोटर वाहन II. मारुती सुझुकी एस-प्रेसो	रु. ३,२०,०००/- (रुपये तीन लाख वीस हजार मात्र)	रु. ३२,०००/- (रुपये बत्तीस हजार मात्र)	रु. १०,००० (रुपये दहा हजार मात्र)
III. मारुती सुझुकी - स्विफ्ट डिझायर	रु. १,९२,०००/- (रुपये एक लाख ब्याण्णव हजार मात्र)	रु. १९,२००/- (रुपये एकोणीस हजार दोनशे मात्र)	रु. १०,०००/- (रुपये दहा हजार मात्र)
IV. प्रतिभूती आणि वित्तीय संपत्ती लघु मुदतीची कर्जे आणि अग्रीम	रु. ६,५२,८१९/- (रुपये सहा लाख बावन्न हजार आठशे एकोणीस मात्र)	रु. ६५,२८१/- (रुपये पासष्ट हजार दोनशे एक्क्याऐंशी मात्र)	रु. ५०,००० (रुपये पन्नास हजार मात्र)

आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३७ए अंतर्गत सहजगत्या वसुल न होणाऱ्या संपत्ती

तपशील	व्यवहाराचे पुस्तकी मूल्य
माननीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठासमक्ष आयबीसी, २०१६ च्या कलम ४४ ते ६६ अन्वये दाखल पीयूएफई व्यवहार अर्जामधून वसुलीचे अभिहस्तांकन	रु. ६,२७,९५,७७५/- (रुपये सहा कोटी सत्तावीस लाख पंचाण्णव हजार सातशे पंचाहत्तर मात्र)

ई-लिलावाच्या महत्त्वाच्या अटी आणि शर्तीः
१. असे स्पष्ट करण्यात येते की, या आमंत्रणाचा हेतू इच्छुक बोलीदारांना आमंत्रित करणे हा आहे आणि विक्री करण्याकरिता परिसमापक किंवा कॉर्पोरेट ऋणकोकडून कोणत्याही प्रकारचे बंधन किंवा वचनबद्धता निर्माण करीत नाही. कोणतेही कारण न दर्शविता आणि कोणत्याही दायित्वाशिवाय प्रक्रिया रद्द करण्याचा किंवा त्यामध्ये बदल करण्याचा आणि/किंवा कोणत्याही बोलीदाराला स्वीकारण्याचा आणि/किंवा अपात्र ठरविण्याचा अधिकार परिसमापकास आहे. इच्छुक बोलीदारांनी लिलावात ठेवलेल्या वस्तुंबाबत स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी.
२. बोलीदारांनी "खरेदीदार नोंदणी" टॅब अंतर्गत नोंदणी करुन बँकनेटच्या ई-लिलाव पोर्टल https://baanknet.com/eauction-psb/bidder-registration वर पूर्व-पात्रता दस्तऐवज व त्यासह नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम २९ए अन्वये, लागू असलेल्या मर्यादेपर्यंत अपात्र नाहीत याची पुष्टी करणारे हमीपत्र सादर करावे. कोणत्याही टप्प्यावर जर बोलीदार अपात्र आढळल्यास, ईएमडी जप्त करण्यात येईल.
३. निर्दिष्ट वेळेनुसार विहीत ईएमडी जमा केली तरच बोली लावण्यास परवानगी देण्यात येईल.
४. विक्री पूर्ण करण्याकरिता यशस्वी बोलीदारास नोंदणी शुल्क आणि इतर लागू कर/प्रभार अतिरिक्त भरावे लागतील.
५. मालमत्तेची ई-लिलावाद्वारे एकत्रित विक्री "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे", "तेथे जे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय" तत्त्वावर काटेकोरपणे करण्यात येईल, कारण अशी विक्री कोणत्याही प्रकारच्या हमी आणि खुकसानभरपाईशिवाय मान्यताप्राप्त सेवा प्रदाता मे. पीएसबी अलायन्स द्वारे बँकनेट https://baanknet.com/ वर करण्यात येईल.
६. ई- लिलावाअंतर्गत कालमर्यादा खालीलप्रमाणे आहेः

सहभागाचे विनंती पत्र/केवायसी/हमीपत्र सादर करण्याचा अंतिम दिनांक	दि. ३१.१२.२०२५
ईएमडी सादरीकरणाचा अंतिम दिनांक	दि. ३१.१२.२०२५
पाहणीचा दिनांक आणि वेळ	दि. १७.१२.२०२५ ते ३१.१२.२०२५ स. ११.०० ते सायं. ०४.३०.
एनआरआरए करिता मोहोरबंद पाकिटामध्ये स्वारस्य अभिव्यक्ती सादरीकरणाकरिता अंतिम दिनांक	दि. ३१.१२.२०२५
ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ (एनआरआरए व्यतिरिक्त)	दि. ०३.०१.२०२६ रोजी दु. १२.०० ते दु. २.०० (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)
ई-लिलाव पोर्टल	https://baanknet.com/
लिलाव एजन्सीचा संपर्क व्यक्ती	पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेड, मोबा. क्र. +९१ ८२९१२ २०२२०
परिसमापकाचे संपर्क तपशील	श्री. गौरांग सी. शाह, मोबा. क्र. ९३२४११००१३ श्री. हर्षल गोटी